2020-21

# KANPUR PHILOSOPHERS

ISSN 2348-8301

International Journal of Humanities, Law and Social Sciences Published Biannually by New Archaeological & Genological Society Kanpur India

TRUE COPY

PRINCIPAL
SHANKARRAO ... ARTS &
COMMERCE ... WAGHOLI
Tal-Koregaon ... Satara

Vol. VIII, Issue-I, 2021

# Index

## Kanpur Philosophers Volume-VIII, Issue-I, January – June 2021


| Sr. No. | Title | Name of Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1. | अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मानवतावाद | प्रा. प्रज्ञा काषिनाथ कांबळे, पिरगांवकर | 1 |
| 2. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता | प्रा.डॉ.आवटे लता दिगंबर | 5 |
| 3. | भूमी आणि स्त्री ; वर्ग–धर्मपूर्व लोकसंस्कृती व कृषिप्रधान तंत्रसाधना | प्रा. रामचंद्र गुलिंग घुले | 9 |
| 4. | चॉईस बेस्ड् क्रेडिट सिस्टीममुळे उच्च शिक्षणात झालेल्या बदलांचा लेखाजोखा व फलश्रुती | डॉ. एस. आर.कट्टीमनी | 21 |
| 5. | 'भेड़ियों ने कहा शुभरात्रि' कविता–संग्रह में अभिव्यक्त मानवीय मूल्यहीनता | डॉ. प्रवीणकुमार न. चौगुले | 28 |
| 6. | प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकांचे व्यावसायिक ताणाचा अभ्यास | Indrajeet Vijaysinh Patil | 35 |
| 7. | जीवन के यथार्थ का चित्रण करने वाला नाटक | डॉ वर्षा गायकवाड | 46 |
| 8. | सायबर गुन्हेगारीचे वाढते प्रमाण व सामाजिक सुरक्षितता: एक समाजशास्त्रीय अध्ययन | श्री. ससाणे जगदीश केशवराव | 50 |
| 9. | प्रजासत्ताक ते फॅसिझम (स्वातंत्र्योत्तर भारतातील बदलती लोकशाही ) | प्रा. डॉ. ओलेकर प्रमोदकुमार अंकुश | 58 |
| 10 | संत साहित्यातील मानवतावाद : स्त्रीशुद्रांच्या विशेषसंदर्भात | प्रा.मानिषा श्रेणिककुमार पाटील | 66 |
| 11 | नॅकच्या चक्रव्यूहात महाविद्यालयांचे मूल्यांकन | प्राचार्य डॉ. संजीव लाटे | 71 |
| 12 | सुक्ष्मवित्तपुरवठ्याची ग्रामीण क्षेत्राच्या आर्थिक प्रगतीत भूमिका | प्रा. सुरेश जोति पाटील | 78 |


TRUE COPY

PRINCIPAL
SHANKAR... ARTS & COMMERCE ... WAGHOLI
Tal-Koregaon ... Satara

Kanpur Philosophers
ISSN 2348-8301
International Journal of humanities, Law and Social Sciences
Published biannually by New Archaeological & Genological Society
Kanpur India
Vol. VIII, Issue I (Summer) 2021

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता

प्रा.डॉ.आदे लता दिगंबर
शंकरराव जगताप आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज,वाघोली
ता.कोरेगाव,जि.सातारा.415525

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रामुख्याने ओळख आहे.ती भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून जगात आजही भारताची राज्यघटना एक आदर्श राज्यघटना म्हणून समजली जाते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तीमत्व अष्टपैलू होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे थोर विचारवंत, अर्थतज्ञ,कायदेपंडित, घटनाकार,घटनातज्ञ, समाजसुधारक, राजकीय नेतृत्व, लेखक आणि पत्रकार हा देखील त्यांच्या व्यक्तीमत्वाचा अविभाज्य पैलू होता. परंतु पत्रकार म्हणून अद्यापही वृत्तपत्रसृष्टीने बाबासाहेबांची म्हणावी तेवढी दखल घेतल्याचे दिसून येत नाही. वास्तविक पाहता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता ही काही पोटभरू किंवा प्रचारकी पत्रकारिता नव्हती, तर तिला समाजोद्धाराचे पर्यायाने राष्ट्रोद्धाराचे मूलभूत अधिष्ठान लाभलेले होते.या बाबीकडे या क्षेत्रातील तज्ञांनी एकतर जाणीवपूर्वक कानाडोळा केला किंवा पारंपारिक मानसिकतेमुळे या पत्रकारितेची दखल घ्यावी असे त्यांना वाटले नसावे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेली पत्रकारिता आजही प्रेरणा देणारी आहे. त्यामुळे मी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता या विषयावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करीत आहे.

**दलित पत्रकारितेचा प्रारंभ :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेला 1920 मध्ये सुरुवात झाली. त्यापूर्वी 1888 साली गोपाळ बाबा वलंगकर यांनी पत्रकारितेस सुरुवात केली होती. 23 ऑक्टोबर 1888 रोजी त्यांनी 'विचार विध्वंस' या नावाची पुस्तिका लिहिली होती. समाजाने निर्माण केलेल्या दुष्टचक्रातून अस्पृश्य वर्गाला कसे बाहेर काढावे याचा ध्यास त्यांना लागलेला होता. दलित समाजातील ते पहिले पत्रकार होते असे म्हणता येईल. यानंतर शिवराम जानबा कांबळे यांनी 'सोमवंशीय मित्र' हे पहिले साप्ताहिक प्रकाशित केले. पूर्णपणे स्वतःचे अग्रलेख लिहिणारे ते पहिले दलित पत्रकार होते. किसन फागु बनसोडे यांनी 'निराश्रीत हिंद नागरिक' हे पत्र 1910 साली, 'विटाळ विध्वंसक' 1913 मध्ये सुरु केले. 1918 मध्ये 'मजूर पत्रिका' सुरु केली. यांनी वृत्तपत्रे सुरु करून जनतेचे प्रश्न समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न केला. 1914 मध्ये विदर्भातील गणेश गवई यांनी 'बहिष्कृत भारत' हे वृत्तपत्र सुरु केले.[1]

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे निश्चित भूमिकेतून पत्रकारितेकडे वळले होते. 1917 साली विविध जाती जमातींच्या मतदानाच्या अधिकाराच्या संदर्भात व्यक्तींच्या साक्षी काढण्यासाठी शासनाने साउथबरो कमिशन नेमले होते. या कमिशनच्या निमित्ताने अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांसाठी झगडण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. त्यांना अस्पृश्यांचे प्रश्न समाजासमोर आणण्यासाठी आपल्याजवळ एखादे साधन असावे असे वाटले. " पंखाशिवाय जसा पक्षी आकाशात भरारी मारू शकत नाही. त्याप्रमाणे समाजात विचार प्रवृत्त करण्यासाठी वृत्तपत्राची गरज असते." हेही त्यांना तीव्रपणे जाणवत होते.[2] या काळात जी वृत्तपत्रे होती. ती वृत्तपत्रे विशिष्ट जातींचीच चाकरी करणारी होती आणि अस्पृश्यांवर अन्याय करणारी होती. याचा अर्थ वृत्तपत्राशिवाय अस्पृश्य समाज अनाथ होता. म्हणून या मूक समाजाच्या वेदना व विद्रोह प्रकट करण्यासाठी एखाद्या प्रकाशनपीठाची गरज होती. या गरजेतून डॉ.बाबासाहेब आंबेडकर पत्रकारितेकडे वळले.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरु केलेली वृत्तपत्रे :**

मूकनायक :



PRINCIPAL
SHANKARRAO JAGTAP ARTS &
COMMERCE COLLEGE, WAGHOLI
Tal-Koregaon Dist-Satara.

असला तरी खालच्या मजल्यात लोटून देण्याची प्रज्ञा नाही."[9] मूकनायक या पत्राने सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबर राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांनी आपले स्थान निर्माण केले पाहिजे ही जाणीव त्यांनी निर्माण केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे पुढील शिक्षणासाठी लंडन येथे गेले व मूकनायक 8 एप्रील 1923 रोजी बंद पडले.

**बहिष्कृत भारत :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना राजकीय,सामाजिक व आर्थिक अशा क्षेत्रातील हक्कासाठी वृत्तपत्राची गरज वाटत होती. या गरजेतून त्यांनी 3 एप्रील 1927 साली बहिष्कृत भारत हे पाक्षिक काढले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर 'बहिष्कृत भारत' या वृत्तपत्राचे स्वतः संपादक होते. दुस-या अंकापासून 'बहिष्कृत भारत' या वृत्तपत्रात बिरुदावली म्हणून ज्ञानेश्वराच्या पुढील ओव्या उद्धृत केलेल्या असत.

आता कोदंड घेऊनि हाती । आरूढ पाइये रथी ।<br>
देई अलिंगन वीरवृत्ती । समाधाने ।<br>
जगी कीर्ती रूढवी । स्वधर्माचा मानु वाढवी ।<br>
इया भारापासोनि सोडवी । मेदिनी हे ।<br>
आता पार्थ निःशंकु होई । या संग्रामा चित्त देई ।<br>
एथ हे वाचूनी काही । बोलो नये । आता केवळ संग्राम ।<br>
संग्रामाविवाय दुसरे काहीही नाही ।[10]

हा तिसरा अध्याय 189,190,191 क. ओवी आता केवळ संग्रामाविवाय काहीही नाही. अशी युद्ध प्रेरणा डॉ.आंबेडकर अस्पृश्यामध्ये चेतवित होते. ही प्रतिज्ञा मुखपृष्ठावर आहे. बहिष्कृत भारताच्या पहिल्या अंकात बाबासाहेब म्हणतात की, "सुधारणेचा कायदा अंमलात आला आहे. इंग्रजांच्या हातची सत्ता काही प्रमाणात वरिष्ठ हिंदी लोकांच्या हाती गेली आहे. बहिष्कृत वर्गाच्या प्रतिनिधीच्या बाबतीत मुळीच दाद न लावता ज्याप्रमाणे एखाद्या जनावराला त्याचा निर्दयी धनी कसाबाच्या स्वाधीन करतो, त्याचप्रमाणे बहिष्कृत वर्गाच्या लोकांना त्यांच्या मायबाप सरकारने वरिष्ठ हिंदी लोकांच्या स्वाधीन केले आहे. दलितांचे हक्क व राजकारणातील प्रतिनिधित्व सिद्ध करता यावे हा राजकीय सुधारणेतील महत्वाचा हेतू 'बहिष्कृत भारत' स्थापन करण्यामागे होता". डॉ.आंबेडकर यांना आर्थिक तरतूद करणे शक्य झाले नाही. या अडचणीमुळे 15 नोव्हेंबर 1929 रोजी 'बहिष्कृत भारत' बंद पडले. या पाक्षिकाचे एकूण 34 अंक निघाले. त्यातला 4 जानेवारी 1929 चा अंक सोडता सर्व अंकात अग्रलेख आहेत. 31 अंकामध्ये आजकालचे प्रश्न 'प्रासंगिक विचार' या सदरामध्ये त्यांनी स्फूट लेख लिहिले आहे. त्याचा स्फूट लेखाची संख्या 145 आहे.

**समता :**

TRUE COPY

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी 'समता' हे वृत्तपत्र सुरू केले. या वृत्तपत्राचे प्रकाशन 29 जून 1928 रोजी झाले. हे वृत्तपत्र डॉ.आंबेडकरांद्वारा समाज सुधार हेतू स्थापित संस्था समता संघाचे (समता सैनिक दलाचे) मुखपत्र होते. याचे संपादक म्हणून बाबासाहेबांनी देवराव विष्णू नाईक यांची नियुक्ती केली होती. समता व 'बहिष्कृत भारत' यांचा काळ एकच होते.

**जनता :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी 'जनता' हे वृत्तपत्र सुरू केले. या वृत्तपत्राचा पहिला अंक 24 नोव्हेंबर 1930 रोजी प्रकाशित झाला. 'जनता' या वृत्तपत्राचे संपादक देवराव विष्णू नाईक हे होते. त्यानंतर गंगाधर नीलकंठ सहस्त्रबुद्धे हे जनताचे संपादक झाले. 'जनता' सुरुवातीला पाक्षिक होते. 31 ऑक्टोबर 1930 वृत्तपत्र रोजी ते साप्ताहिक झाले. 'जनता' वृत्तपत्राची बिरुदावली म्हणून "गुलामाला तु गुलाम आहेस असे सांगा म्हणजे तो बंड करून उठेल हे वाक्य होते".[11] या वृत्तपत्रातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व निकडीचे प्रश्न चर्चिले होते. तसेच 'जनता' या वृत्तपत्रातून म्हणजे त्यांनी विलायतेतून पाठविलेली पत्रे प्रकाशित झाली होती. 'जनता' पत्राच्या पहिल्या अंकात संपादकांनी म्हटले होते की, 'समता' व 'बहिष्कृत भारत' ही दोन्ही पत्रे बंद पडल्यामुळे मागासलेल्या व पददलित जनतेच्या सुखदुःखाचा व भावनाचा आपलेपणाच्या दृष्टीने विचार करणारे व जनतेचे विचार बोलून दाखवणारे दुसरे पत्र या भागात उरले नाही. त्यामुळे आपल्या विचाराची कुचंबणा होत असल्याची व आपल्या हेतूचा जाणत नकळत विपर्यास करण्यात येत असल्याची तीव्र जाणीव होऊ लागली आहे. त्यामुळे सध्याची परिस्थिती नवीन पत्र सुरू करण्याची अनुकूल परिस्थिती असूनही 'जनता' हे पत्र सुरू करण्याचे धाडस करावे लागत आहे.

डॉ.आंबेडकर स्वतःही मार्गदर्शन करण्यासाठी 'जनता' पत्रात लेख लिहित असत. विशेषतः 13 ऑक्टोबर 1935 साली येवला परिषदेत धर्मांतराची घोषणा केली. त्यावेळी आपली भूमिका स्पष्ट करताना सामाजिक व धार्मिक प्रश्न मार्गाला लावण्याच्या दृष्टीने त्यांनी 'जनता' पत्रात खास लेख लिहिले. 1937 साली डॉ. आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र मजूर पक्षातर्फे निवडणूक लढविण्यात आली. त्यावेळी 'जनता' पत्राने विशेष प्रभावी कार्य केले. पुढे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर डॉ. आंबेडकरांनी केंद्रीय कायदेमंत्री म्हणून व राज्यघटनेचा मसुदा तयार करणा–या समितीच्या अध्यक्ष म्हणून जी अपूर्व कामगिरी बजावली तिची माहिती 'जनता' पत्राने जनतेपुढे ठेवली. ऑक्टोबर 1931 पासून 'जनता' पत्र साप्ताहिक झाले व 1956 पर्यंत चालू राहिले. देवराव नाईक, भास्कर कद्रेकर, गणेश सहस्त्रबुद्धे, दी.सी.कांबळे, यशवंत आंबेडकर इत्यादींनी संपादकाची सूत्रे सांभाळली.[12]

**प्रबुद्ध भारत:**



PRINCIPAL
SHANKARRAO ... ARTS &
COMMERCE ... COLLEGE, WAGHOLI
Tal-...

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी हे वृत्तपत्र 14 ऑक्टोबर 1956 रोजी बौद्ध धर्माची दिक्षा घेतल्यानंतर 'जनता' वृत्तपत्राचे 4 फेब्रुवारी 1956 मध्ये 'प्रबुद्ध भारत' असे नामकरण झाले. या पत्राच्या मुखशीर्षावर 'अखिल भारतीय दलित फेडरेशनचे मुखपत्र' छापले होते. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर हे वृत्तपत्र बंद पडले.

थोडक्यात बाबासाहेबांची पत्रकारिता सखोल जाणून घेण्यासाठी 'मूकनायक' आणि 'बहिष्कृत भारत' ही दोन पत्रे त्यासाठी आधारभूत आहेत.या पत्रांमधून डॉ. आंबेडकरांच्या पत्रकारितेचे समग्र दर्शन घडते.

**निष्कर्ष :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे स्वतः उत्कृष्ट पत्रकार होते. एखादी चळवळ उभी करावयाची असेल तर त्यासाठी विचारांची पेरणी करावी लागते, त्यासाठी स्वतंत्र व आत्मनिर्भर साधन लागते. वृत्तपत्र हे त्या दृष्टीने प्रभावी माध्यम व साधन होय. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जी नियतकालिके सुरू केली होती, ती लोकहितासाठीच होती. त्यांनी जे विषय लिहिण्यामागील त्यांची भूमिका ही लोककल्याणाचीच होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्य बांधवांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. अस्पृश्य बांधवावर अन्याय, अत्याचार होत होता. अस्पृश्यांवर सामाजिक व धार्मिक गुलामगिरी लादली होती. त्यांना कोणताही हक्क व अधिकार नव्हता. आपले हक्क व अधिकार मागण्यासाठी संघर्ष करण्यास प्रवृत्त केले. गुलामाला गुलाम असल्याची जाणीव करून दिली. येवढी वर्षांपासून अस्पृश्य बांधव दारिद्र्यामध्ये जीवन जगत होता. या लोकांचे जीवन जनावरापेक्षाही वाईट होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी वृत्तपत्र काढून आपले विचार या लोकांपर्यंत पोहचविले. कुठलाही व्यावहारीक स्वार्थ न साधता केलेली ही त्यांची पत्रकारिता दलितांच्या प्रश्नांच्या संदर्भात महत्त्वाची आहे. तसेच सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रश्नांच्या बाबतीत महत्त्वपूर्ण आहे. आपल्या सर्वच वृत्तपत्रावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नितांत प्रेम होते. नियतकालिकांचे योग्य संवर्धन व्हावे यासाठी योजना आखल्या होत्या. आपल्या वृत्तपत्रांचे [illegible] त्यांचा दर्जा सुधारावा व ते लोकप्रिय व वाचकप्रिय व्हावे, याची दक्षता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी [illegible] होती. तत्कालीन परिस्थितीवर लिखाण करून अन्याय करणा-याविरुद्ध आवाज उठविला. अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्यास अस्पृश्य समाजाला प्रवृत्त केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्य बांधवांना मानसन्मान, प्रतिष्ठा व अभिमान मिळवून देण्यासाठी [illegible] अशाप्रकारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितोद्धाराचे कार्य केले. वृत्तपत्र हे समाजप्रबोधनासाठी असतात ते पैसे कमविण्यासाठी नसतात हे त्यांनी दाखवून दिले.डॉ.आंबेडकर यांनी वृत्तपत्रात उत्कृष्ट लेखन केले.


**संदर्भ ग्रंथ :**

1.देवेंद्र भूजबळ, 'भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरक पत्रकारिता' भाग 1,[illegible] पृ.1 ,विकासपेडीया

2. तत्रैव पृ.1

3. डॉ.अनिल सिंगारे,'महाराष्ट्रातील आंबेडकर चळवळीचा इतिहास', अरुणा प्रकाशन,लातूर, आ–1,8 जुलै 2012 पृ.35

4.एस.के. कुलकर्णी, 'पत्रकारिता मार्गदर्शक', पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन, पुणे–30, जाने.2009, पृ.39

5.दयानंद काशिनाथ गायकवाड,'महामानव डॉ.भीमराव रामजी आंबेडकर' रिया प्रकाशन,पुणे, 2016,पृ.102

6.पांडुरंग नंदराम भटकर, 'मूकनायक', 31 जानेवारी 1920,मुंबई, वर्ष 1 ले, अंक 1 ले, रजि.नं.बी 1430

7.,एस.के. कुलकर्णी, 'पत्रकारिता मार्गदर्शक', पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन, पुणे–30, जाने.2009, पृ.39

8.गाठाळ एस.एस.,'आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास', कैलास प्रकाशन,औरंगपुरा औरंगाबाद 2017,पृ.424,425

9.राजबहादूर, ' डॉ.बाबासाहेब आंबेडकर का सृजनात्मक साहित्य' फारवर्ड प्रेस हिंदी भाषेत– पांडुरंग नंदराम भटकर 'मूकनायक', 31 जानेवारी 1920,मुंबई, वर्ष 1 ले, अंक 1 ले, रजि.नं.बी. 1430

10.डॉ.बाबासाहेब आंबेडकर संपादक 'बहिष्कृत भारत',23 डिसेंबर 1927, अंक 19,20,29,वर्ष 1 ले

11.रा.के. लेले,'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास',कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे,आवृत्ती 3,2009,प्रकाशन क्रमांक 984.

12.तत्रैव प्रकाशन क्रमांक 984